**RNI No. MAHBIL /2009/31748**
**Reg. No. MCS/174/2016-18**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—अ-मध्य उप-विभाग

**वर्ष २, अंक ४१] बुधवार, ऑगस्ट ३, २०१६/श्रावण १२, शके १९३८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑगस्ट २०१५.

**संदर्भ** : (१) क्र. एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ चे आदेश.
(२) क्र. एसईसी-१०९५/१०१/कार्या-३, दिनांक २१ एप्रिल १९९५ चे आदेश.
(३) क्र. रानिआ-मनपा/२००६/प्र. क्र.१७/का.५, दिनांक ३० जुलै २०११ चे आदेश.
(४) क्र. रानिआ-/नप/२००९/प्र. क्र.१३/का.५ व ६, दिनांक ५ जून २०१० चे आदेश.
(५) क्र. रानिआ-जिपपंस/२०१०/प्र.क्र. ९/का.७, दिनांक १९ नोव्हेंबर २०१० चे आदेश.

**आदेश**

क्रमांक रानिआ/नप-२०१५/प्र.क्र. १०/का. ६

ज्याअर्थी.—

(१) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

(२) राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा, खर्च सादर करण्याचा कालावधी आणि पद्धत दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ मध्ये निश्चित केली असून खर्चाच्या मर्यादेमध्ये वेळोवेळी सुधारणा केलेली आहे. सध्या खर्चाची मर्यादा दिनांक ३० जुलै २०११ च्या आदेशाप्रमाणे वापरण्यात येते.

(३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एमईसी-१०९५/१०१/कार्य-३, दिनांक ७ फेब्रुवारी १९९५ अन्वये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाची माहिती निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांत सादर करणे बंधनकारक आहे.

(४) उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणुक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि रितीने देण्यात कसूर केली तर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीकरिता त्याला तीन वर्षांच्या कालावधीकरिता व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व

ग्रामपंचायतींकरिता पाच वर्षांकरिता अनर्ह ठरविण्याबाबतची तरतूद केलेली आहे. अनर्ह ठरविण्याचे अधिकार महानगरपालिकांकरिता विभागीय आयुक्त आणि नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता जिल्हाधिकारी यांना दिनांक ५ जून २०१० व दिनांक १९ नोव्हेंबर २०१० च्या आदेशान्वये प्रदान करण्यात आलेले आहेत (सक्षम अधिकारी).

(५) सक्षम अधिकाऱ्याने उमेदवारास अनर्ह ठरविल्यानंतर महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींकरिता अनर्ह झालेले उमेदवार राज्य निवडणूक आयुक्त यांच्याकडे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींकरिता विभागीय आयुक्त यांच्याकडे अपिल दाखल करू शकतात.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या खालील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत,—

(१) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबतचे विवरणपत्र उमेदवार वेळीच सादर करत नाहीत.

(२) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी उमेदवारांना अनर्ह ठरविण्याबाबतचे आदेश अनेक वेळा विलंबाने काढतात.

(३) नगरपरिषदा/नगरपंचायतींमध्ये अनर्ह ठरविण्याचे आदेश संबंधित जिल्हाधिकारी यांचे असून अपिल थेट राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे आहे. (याउलट जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीकरिता सक्षम अधिकारी जिल्हाधिकारी असून अपिल विभागीय आयुक्त यांच्याकडे आहे.

आणि ज्याअर्थी,

वरील कारणांमुळे निवडणूक खर्च विहित कालावधीत व रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना वेळीच अनर्ह ठरविले जात नाही.

त्याअर्थी,

(१) निवडणुकीमध्ये केलेल्या खर्चाबाबत माहिती संबंधित उमेदवाराने वेळीच सादर करणे, आणि

(२) विभागीय आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांनी संबंधिताना वेळीच अनर्ह ठरविणे.

या दोन बाबींकरिता राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनयम, १९६५ च्या कलम १०ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ९अ महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :—

## आदेश

(१) निवडणुकांच्या नामनिर्देशनपत्रासोबत संबंधित उमेदवार यांचेकडून सोबत जोडलेल्या परिशिष्ट-१ नुसार हमीपत्र घेण्यात यावे.

(२) या आदेशाच्या दिनांकापासून अनर्ह ठरविणे व अपिलावर निर्णय घेण्याचे अधिकार खालीलप्रमाणे राहतील :—

(अ) निकाल घोषित झाल्याच्या दिनांकापासून संबंधित उमेदवारांनी ३० दिवसांच्या आत खर्चाचा हिशोब विहित रितीने सोबतच्या परिशिष्ट-२ मधील रकाना क्रमांक (३) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सादर करावा.

(ब) खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार रकाना क्रमांक (४) मध्ये नमूद सक्षम अधिकारी यांना राहतील त्यांनी अनर्हतेसंबंधीचा निर्णय सर्वसाधारणपणे कमाल ३ महिन्यांत घ्यावा.

(क) सक्षम अधिकारी यांनी अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुद्ध संबंधित उमेदवारास अनर्ह ठरविल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रकाना क्रमांक (५) मध्ये नमूद केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अपिल दाखल करता येईल.

(ड) अपिलीय अधिकारी यांनी सर्वसाधारणपणे १ महिन्यात अपिलावर निर्णय घ्यावा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**ध. मा. कानेड,**

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

## परिशिष्ट-१

## हमीपत्र

मी श्री/श्रीमती ........................................................................................................ (स्वतःचे नाव) श्री .............................. वडिलांचे/पतीचे नाव यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय .............................. वर्षे, राहणार .................................................................................................. (पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो/करते की,

१. मी ........................................................................................ महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत निवडणुकीसाठी * प्रभाग/ निवडणूक विभाग/निर्वाचन गण क्रमांक ................ मधून या .............................. (जागेचे नाव असल्यास) जागेकरिता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२. मी दररोजच्या निवडणूक खर्चाचा हिशोब दुसऱ्या दिवशी २-०० वाजेपर्यंत सादर करावयाची हमी घेतो/घेते.

३. मी निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत विहित शपथपत्रासह निवडणूक खर्चाचा सविस्तर हिशोब सादर करून त्याची पोचपावती घेण्याची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

४. निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या कालावधीत निवडणूक खर्चाचा हिशोब विहिती पद्धतीने सादर करण्यास कसूर केल्यास मी महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह/अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

स्थळ : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

दिनांक :

आवश्यक नसलेला मजकूर खोडावा.

## परिशिष्ट-२

| अनुक्रमांक | स्थानिक स्वराज्य संस्था | खर्चाचा हिशोब कोणास सादर करावयाचा आहे (प्राधिकृत अधिकारी) | खर्चाचा हिशोब विहित मुदतीत व रितीने सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्यास सक्षम अधिकारी | अनर्ह ठरविल्याच्या आदेशाविरुद्ध अपिल कोणाकडे दाखल करता येईल ? |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | महानगरपालिका | महानगरपालिका आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला महानगरपालिका उपायुक्त यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी. | विभागीय आयुक्त | आयुक्त, राज्य निवडणूक आयोग. |
| २ | नगर परिषद, नगर पंचायती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्ह्याकरिता एक). | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ३ | जिल्हा परिषद, पंचायत समिती | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला उपजिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (जिल्ह्याकरिता एक) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ४ | ग्रामपंचायत | जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला तहसीलदार यांच्यापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी (आवश्यकते-प्रमाणे प्रत्येक तहसिलकरिता एक). | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |

**ध. मा. कानेड,**
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.